# गरिबी

१९६० च्या दशकाच्या अखेरीस माझ्या प्राध्यापकीय जीवनाला सुरुवात झाली. पण, १९६० च्या दशकाच्या सुरुवातीपासूनच माझ्या महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणात देशाच्या गरिबीचे विवेचन आणि होणारे त्याचे विश्लेषण मनात बिंबले होते. भारतीय अर्थशास्त्राचा सारा अभ्यास भारताच्या गरिबीच्या प्रश्नाभोवती विणलेला होता. एकीकडे भारताच्या गरिबीची कारणे शिकायची आणि दुसरीकडे पाश्चात्य राष्ट्रांच्या श्रीमंतीच्या कारणांची शहानिशा करायची हा आमच्या अर्थशास्त्राच्या शिक्षणातला मध्यवर्ती भाग असायचा. गरिबीच्या अर्थशास्त्राचा व्यत्यास असलेले विकासाचे अर्थशास्त्र-म्हणजे प्रामुख्याने पाश्चात्य देशांच्या विकासाचे अर्थशास्त्र, त्यांतील वेगवेगळी विकासाची प्रतिमाने वगैरे बाबींना अर्थशास्त्राच्या शिक्षणात महत्त्व प्राप्त झालेले होते. पुढे पदव्युत्तर पातळीवर माझा तो शिकविण्याचा खास विषय होता.

१९७० च्या दशकाची सुरुवात, जगभरच, दारिद्र्याच्या मीमांसेने झालेली आठवते. गुन्नार मिर्दाल यांचे ‘एशियन ड्रामाः ॲन एन्क्वायरी इन टू पॉव्हर्टी ऑव्ह नेशन्स' (१९६८) हा जगभर गाजलेला ग्रंथ, प्रामुख्याने भारताच्या दारिद्र्याची चिकित्सा करणारा ग्रंथ होता. दारिद्र्य निर्मूलन (आणि शिक्षण) ही भारतात दुर्लक्षित असलेली क्षेत्रे आहेत, असे काहीतरी त्याचे चिंतायुक्त विवेचन होते. गुन्नार मिर्दाल यांचे 'द चॅलेंज ऑव्ह वर्ल्ड पॉव्हर्टी' हे पुस्तकही लगोलग (१९७०) आले होते. भारतातील अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर व नीळकंठ रथ यांचे 'पॉव्हर्टी इन इंडिया' हे (१९७१) साली प्रथमतः प्रकाशित झालेले पुस्तक त्या काळात बरेच गाजले. देशाचे अल्प उत्पन्न आणि पुन्हा त्याची विषम विभागणी यांचे त्यांनी केलेले विश्लेषण आणि दारिद्र्याचे मोजमाप आजही महत्त्वाचे मानले जाते. याच सुमारास पुढे मागे केव्हातरी मिन्हास, बर्धन व अहलूवालिया यांचेही दारिद्र्यविषयक ग्रंथ प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे, १९७० चे सारे दशक आणि पुढेही १९८० चे दशक भारताची गरिबी या विषयाभोवती भारतीय अर्थशास्त्र आणि भारतातील आर्थिक नियोजन-पंचवार्षिक योजना-रिंगण घालत होते. आम्ही, म्हणजे अर्थशास्त्राचे तत्कालीन अभ्यासक गरिबीच्या समस्येच्या अभ्यासात बराच वेळ घालवीत असू.

या विषयाशी संबंधित अशा दोन घटना माझ्या वैयक्तिक आयुष्यात आल्या. एक म्हणजे याच सत्तरच्या दशकात केव्हातरी मी एकोणिसाव्या शतकातील भारतातील अर्थशास्त्रीय लेखनाकडे उत्सुकतेने वळलो. त्यातही प्रामुख्याने मी वेध घेत होतो तो मराठीमधील अर्थशास्त्रीय लेखनाचा.

भारतातील एकोणिसाव्या शतकातील प्रबोधकर्त्यांविषयी, आणि अर्थातच, त्यांच्या प्रबोधकार्याविषयी मला विलक्षण कुतूहल आहे. फार थोर मंडळी फार थोर कार्य करून गेली. विचारांच्या अंगांनी होत गेलेली प्रगती प्रभावी करणारी होती. मी माझ्या अभ्यासाची सुरुवात, थेट १८१८ पासून,म्हणजे पेशवाईच्या अस्तापासून केली. लक्षात आले की यानंतर केवळ पाचच वर्षांनी, १९२३ साली, लोकहितवादींचा जन्म झाला आहे. विसाव्या शतकातल्या अनेक मराठी विद्वानांनी लोकहितवादींविषयी लिहिले आहे. एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनकार्यात त्यांना मानाचे स्थानही दिले आहे. परंतु १८४८ ते १८७६ या चाळीस वर्षांच्या त्यांच्या कार्याचे व लेखनाचे परिशीलन करीत असता मला जाणवले ते असे की, लोकहितवादी हे मूलतः

अर्थशास्त्रज्ञ आणि काहीसे समाजशास्त्रज्ञ व संस्कृतिशास्त्रज्ञ आहेत. १८४८ साली त्यांचे, होरस विल्यम क्लिफ्ट यांच्या अर्थशास्त्रीय ग्रंथावर आधारलेले 'लक्ष्मीज्ञान' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याचवेळी त्यांचे शतपत्रांचे लेखनही चालू होते. 'लक्ष्मीज्ञान' वाचले तर लक्षात येते ते असे की, लोकहितवादींना तत्कालिन ॲडम स्मिथप्रणित अर्थशास्त्र अभ्यासून एक नवी अर्थशास्त्रीय दृष्टि त्यांना प्राप्त झाली, आणि या नव्या डोळयातूनच त्यांनी भारताची तत्कालीन परिस्थिती पाहिली, व त्यावर चिंतनात्मक लेखन केले आहे. त्यांचे सर्वच म्हणजे समाजशास्त्रीय, ऐतिहासिक अथवा धार्मिक लेखन याच अर्थशास्त्रीय दृष्टिकोणांतून केले गेले आहे. लोकहितवादी हे भारतातील, प्रबोधनकालातील पहिले अर्थशास्त्रज्ञ आहेत हे मला उमगले. तसे मी लोकहितवादींविषयी केलेल्या लेखनांतूनही मांडले आहे. भारतातील दारिद्र्याची दखल घेणारेही लोकहितवादी हे पहिले अर्थशास्त्रज्ञ आहेत. १८७६ साली प्रकाशित झालेला त्यांचा 'दारिद्र्या' वरील ग्रंथ ही त्याची साक्ष आहे.

एक गंमतीदार भाग असा की, दादाभाई नौरोजी या तत्कालीन दिग्गज पुढाऱ्याचा 'पॉव्हर्टी ऑव्ह इंडिया' हा इंग्रजी ग्रंथही नेमका १८७६ सालीच प्रसिद्ध झाला आहे. साहजिकच, लोकहितवादींवर लेखन केलेल्या अनेकांनी आपली अशी ठाम समजूत करून घेतली की, ज्याअर्थी कमालीचा विश्लेषक व आकडेवारीवर आधारित असा ग्रंथ, दादाभाईंनी इंग्रजीत प्रकाशित केला आहे त्याअर्थी लोकहितवादींचा 'दारिद्र्य.........' हा छोटेखानी मराठीतील ग्रंथ, दादाभाईंच्या ग्रंथावरच आधारलेला असणार. त्यामुळे, अथवा अर्थशास्त्रात उतरुन दोन्ही ग्रंथांची तुलनाच कधी न केल्याने, मराठी साहित्यिकांची अशी गल्लत झाली. मूळ मुद्दा असा की, लोकहितवादींनी भारतातील दारिद्र्याची स्वतंत्रपणे चिकित्सा केली आहे. फक्त योगायोगानेच दादाभाईंचा व त्यांचा ग्रंथ एकाच वर्षी प्रकाशित झाला. किंबहुना असेही दिसून येते की, लोकहितवादींचा ग्रंथ हा केवळ आर्थिक नव्हे तर इथल्या परिस्थितीचे आर्थिक व सामाजिक असे दुहेरी विश्लेषण करणारा आहे; उदाहरणार्थ, अगदी आदिवासी या खास समाजगटाच्या विलक्षण दारिद्र्याकडेही त्यांनी सुमारे एकशेचाळीस वर्षांपूर्वी, लक्ष वेधले आहे.

अर्थशास्त्राच्या क्षेत्रात असल्यामुळे गरिबीच्या समस्येशी आणि त्यासंबंधीच्या विविध कारणमीमांसांशी असा माझा संबंध जवळून आला. परंतु याला वेगळी वैचारिक कलाटणी मिळाली ती मी१९८२ साली, ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील आदिवासी पट्ट्यामध्ये काम करायला सुरवात केल्यानंतर.

डहाणू तालुक्यातील दाभोण या खोलवरच्या जंगली भागातील एका गावात, ग्राममंगल नावाची संस्था उभी करून मी जेव्हा कामाला सुरुवात केली, तेव्हा, प्रत्यक्ष गरिबीत जीवन व्यतित करीत असलेल्या समाजाशी जवळून संबंध आला. एकीकडे बालवाडीसारखी काही पायाभूत कार्ये सुरू केली, पण दुसरीकडे माणसांची-विशेषतः कुटुंबांची गरिबी समजावून घेणे, प्रदेशाची गरिबी समजावून घेणे, आणि त्यासाठी समाजाशी जवळिक साधणाऱ्या काही लहान-मोठ्या गोष्टी करणे या गोष्टींत मी अधिक रस घ्यायला सुरवात केली.


गरिबीचा शोध घेणे आणि जमेल तसे नि तेवढे, पण विचारपूर्वक नि नीट नियोजन करून गरिबी निर्मूलनाचा प्रयत्न करीत जाणे अशी माझी प्रयत्नांची दिशा असणार होती. सुरुवातीलाच माझ्या एका विद्यार्थिनीचा प्रबंध तयार करण्याच्या दृष्टीने, दाभोण गावातील प्रत्येक घराला भेट देऊन घरावर

कुटुंबप्रमुखाच्या नावाची पट्टी लावणे, त्यावर घरक्रमांक घालणे इथपासून सुरुवात केली. गरिबी म्हणजे आर्थिक गरिबी. ती शोधण्यासाठी व तिचे रास्त मोजमाप करण्यासाठी व्यवसाय, उत्पादन, उत्पन्न, शेतीव्यवहार, कर्जे, सावकार, घरातील माणसांची संख्या, मजुरीचे दर, शिक्षण-आरोग्य-वीज-पाणी इत्यादींच्या सुविधा अशा व अन्य अनेक गोष्टींना अभ्यासात आणले आणि गरिबीचा शोध घेऊ लागलो. माझ्या लक्षात आले ते असे की, माणसाची गरिबी असे परिमाण न ठरवता कुटुंबाची गरिबी पाहिली पाहिजे; माणसांचा आणि त्यांच्या भोवतालच्या मर्यादित प्रदेशाचा एकत्रित विचार केला पाहिजे; उत्पादनाच्या उपलब्ध साधनांचाच वापर करून परस्पर साधनांनाच बळ प्राप्त करून दिले पाहिजे; पाण्याचा विचार प्राधान्याने केला पाहिजे. गावाचा विकास असा विचार होण्यापेक्षा पंचक्रोशीचा विचार हा आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम ठरणारा आहे. अर्थातच गावविकासाची पुढील आखणी व काम या दिशेने व्हावे असे ठरविण्यात आले.

याच काळात गरिबी दूर होण्याचा सर्वोत्तम मार्ग खात्रीशीर रोजगार हाच आहे, हे मनावर बिंबले जात होते. १९७३-७४ च्या सुमारास महाराष्ट्रात शासकीय स्तरावर न रोजगारहमी योजना राबविण्यास सुरुवात झाली होती. तिचे परिणाम आशादायक होते. रोजगार-निदान एका माणसाचा रोजगार-सबंध कुटुंबाला आधार देऊ शकतो; तो पुरेसा नि पुरेशा उत्पन्नाचा मात्र असला पाहिजे असे लक्षात येऊ लागले होते.

मी काम करीत असलेल्या भागात, शालान्त परीक्षेपर्यंत पोचलेली पण ती परीक्षा पार करू  न शकलेली अशी अनेक तरुण मंडळी होती. त्यांच्या रोजगाराचाच एक प्रश्न नजरेसमोर येऊ लागला होता. त्याच्या सोडवणुकीसाठी 'आदिवासी गृहउद्योग संस्था' उभी करून आदिवासी युवकांना वेगवेगळया वस्तुनिर्मितीचे तंत्रशिक्षण देण्याचा प्रयोग विक्रमगड येथे सुरू केला. त्याला त्यावेळी थोडे यश नि बरेचसे अपयशही आले.

माझ्या भोवतालच्या, गरिबीच्या कारणांचा वेध घेताना लक्षात आले ते असे की, प्रश्न सरळ नाही तर गुंतागुंतीचा आहे. अनेक घटक कारणीभूत आहेत. इतकेच नव्हे तर ते बऱ्याचदा परस्परावलंबीही आहेत. त्यांची सारभूत मांडणी करणारा एक त्रिकोण माझ्या नजरेसमोर आला.




गरिबी असली की शोषणाची शक्यता निर्माण होते नि अज्ञानाने ती पक्की होते. येथे अजूनही वस्तुविनिमय हे शोषणाचे सोयीस्कर साधन होते. बरेचसे भात देऊन थोडेसे मासे खरीदणे किंवा वाडीच्या मालकाकडून काही पोती धान्य घेऊन वर्षभर कामासाठी बांधून घेणे इत्यादी प्रकारे शोषणप्रक्रिया चालू असायची. विकासकामांबरोबर शिक्षणाला भिडल्याने त्रिकोण खंडित करण्याची प्रक्रिया काहीशी घडू शकेल. या निष्कर्षाला आलो. म्हणून पुढे लहानपणापासूनच्या शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले.

काही गोष्टी गाभ्याच्या असतात. वरवर पाहिले असता त्या दिसून येत नाहीत. क्वचित जाणवल्या तरी त्यांचे त्या त्या वेळी महत्त्वही लक्षात येत नाही. आदिवासी मागासलेपणाच्या त्रिकोणातील अज्ञान या घटकाला हात घालू मी त्रिकोण खंडित करण्याचा प्रयत्न करणार होतो. मात्र सुरुवात केवळ निरक्षरतेला दर करण्यापासून करायची होती. यापेक्षा अधिक काही त्यावेळी सुचत नव्हते. पण पुढे पुढे, हळू हळू उमगत गेले की साक्षरतेसाठी शाळा सुरू करणे सोपे होते, पण तेथे शिक्षण देणे खूपच कठीण होते. हा शिक्षण देण्याचा जो घाट आमच्याकडून घातला जात होता, त्यात तीन अडचणी लाल सिग्नल होऊन उभ्या होत्या; आणि याच नेमक्या गाभ्याच्या गोष्टी होत्या.

१. छान मोकळे ढाकळे, मुक्त, स्वच्छंद आयुष्य जगत असलेल्या लहान मुलांनी, कुणाच्या तरी आग्रहाखातर, शाळा नामक खोलीत, काही तास स्वस्थ बसायचं आणि समोरचा सांगेल ते ऐकायचं, निरर्थकतेने लेखन वाचनात स्वतःला कोंडून घ्यायचं हे, त्यांना कसं जमणार ? कसं आवडणार?
२. आदिवासी मुलांच्या शिक्षणाच्या प्रयत्नांत अर्धे शतक घालविलेल्या, ताराबाई मोडक, अनुताई वाघ व सिंधूताई अंबिके यांनी या अशा मुलांना शाळेकडे वळविण्यातील अडचणी व प्रयत्नांची पराकाष्ठा यांविषयी खूपसे लिहून ठेवले आहे. शिक्षणाचे वारे आपणहून पसरत असते असे आपण उगीचच मानतो; वास्तविक तसे काही घडत नसते, असाच अनुभव येतो. एकीकडे घडले म्हणून शेजारच्या गावातही ते घडेल असे ठाम विधान, औपचारिक शिक्षणाच्या संदर्भात करणे खूप कठीण आहे. कोसबाडला खूप काही, काही वर्षांमध्ये घडले; परंतु, ते आजूबाजूच्या प्रदेशात फारसे फैलावले नाही. आम्ही दाभोणला सारे प्रयत्न नव्यानेच सुरू केले होते.

मुले शाळेत येत नाहीत किंवा आल्यानंतरही टिकत नाहीत याची कारणे, पालकांच्या व ते ज्या समाजगटांचा भाग आहेत, त्या समाजगटांच्या आर्थिक दुर्बलतेत शोधण्याचे आणि तसे मानून त्यावर उपाय करण्याचे अनेक प्रयत्न गेल्या अर्धशतकात मोठ्या प्रमाणावर देशात झाले. मुलांना मध्यान्हीचे जेवण देणे किंवा मुलींना उपस्थितीचा रोजचा रुपया देणे हा अशाच उपायांमधला भाग होता. या उपायांमुळे जेवढा भ्रष्टाचार वाढला, तेवढी मुलांची उपस्थिती वाढली नाही की गळती कमी झाली नाही. त्यामुळे गरिबी हे मुलांनी शिक्षणाकडे न वळण्याचे कारण नाही, हे कळायलाही आपल्याला अनेक वर्षे लागली. आता उपायांचीही सवय झाल्यामुळे, उपायगिरी मात्र त्यांतील हितसंबंध जोपासून चालू राहिलीच आहे.

शाळेबाहेरच्या मुक्त वातावरणाला दमदार पर्याय शाळा पुरवीत नाहीत हे खरे मुलांनी शाळा नाकारण्याचे कारण आहे. प्रोब अहवालाने शाळा वाईट आहेत म्हणून मुले शाळेत जात नसल्याचे शोधून काढलेच आहे. शाळेबाहेरच्या मुक्त वातावरणात असलेले वैशिष्ट्यपूर्ण घाटक शाळेच्या आवारात आढळत नाहीत. त्यांना सक्तीने दाखल करावे लागते. शाळेत न जाणाऱ्यांच्या इतकेच शाळेत सक्तीने अडकवलेल्या मुलांबाबतही हे खरे आहे. त्यांना शाळेत जाण्यापेक्षा शाळेत न जाणे आवडते. शालेय दिवसांपेक्षा सुट्ट्या आवडतात. सकाळी शाळेत जाताना नव्हे तर सायंकाळी शाळेतून परतताना मुले आनंदी असतात, हे सारे शाळा फारशी न आवडण्याचेच द्योतक आहे. शाळेबाहेरच्या मुक्त वातावरणात मुलांना वागण्या-विहरण्याचे स्वातंत्र्य

असते; शाळा ते हिरावून घेते. शाळेबाहेरच्या मुक्त वातावरणात, मुलांना भरपूर विविध प्रकारचे अनुभव प्राप्त करण्याची संधी आपसूकच मिळते, परंतु शाळा ही त्याच्या अशा अनुभवांच्या संधींची वाटच बंद करतात. आणखी एक असे की, शाळाबाह्य वातावरणात अनेकांशी, वेगवेगळया संदर्भात संपर्काच्या आणि त्यांतून सामाजिकीकरण्याच्या संधी सहजतेने मिळतात. सामाजिकीकरणाची ही प्रक्रिया शाळेमध्ये, मर्यादित होते. काही निवडक मित्रांपुरती बंदिस्त होते. शाळेबाहेरच्या मुक्त वातावरणात मुलांना नैसर्गिकरित्या शिकण्याच्या संधी मिळतात; नवनवी आव्हाने समोर उभी ठाकतात आणि मुले काहीना काही सातत्याने शिकत जातात. मुलांचा मेंदू सदैव तरतरीत राहतो.

शाळा अशी आव्हाने देत नाहीत आणि जे देतात त्यातून म्हणजे, पुनरावृत्ती, पाठांतर, गृहपाठ इत्यादींमधून मुलांचा मेंदू थकतो. त्यामुळे आजच्या पठडीबद्ध शाळांनी मुलांच्या शिकण्याचे नैसर्गिक दरवाजे बंदच करत आणले आहेत, असे दिसते.

२. वरवर साधा दिसणारा पण खोलवर पाहिले असता गुंतागुंतीचा असा प्रश्न म्हणजे भाषेचा प्रश्न. या भाषेच्या प्रश्नाचे सरळ सरळ दोन भाग आहेत, आणि ते दोन्हीही स्वतंत्रपणे सोडवावे लागतात. एक आहे तो शिक्षणाच्या भाषेचा प्रश्न, आणि दुसरा आहे तो भाषेच्या शिक्षणाचा प्रश्न. पहिला आहे तो शिक्षणाच्या उंबरठ्यावरचाच प्रश्न आहे, दुसरा शिक्षणात प्रवेश केल्याक्षणीच सुरु होणारा प्रश्न आहे.

विविध प्रदेशातील आदिवासी समाजांच्या बोली या त्या प्रदेशांतील मुख्य भाषेहून भिन्न असतात. ही भिन्नता-तिचे प्रमाण किती टोकाचे आहे त्यावर शिक्षणाच्या भाषेच्या अडचणींची तीव्रता अवलंबून असते. उदाहरणार्थ, ग्राममंगलच्या कार्य-परिसरातील वारली बोली आणि भोवतालची मराठी भाषा यांमधील अंतर खूपच कमी असल्यामुळे, मुलांना वारलीचा वापर करत करत मराठीकडे वळणे फारसे कठीण नव्हते. बोलीकडून एका प्रमाणभाषेकडे वळण्याची एक व्यूहरचना म्हणूनही आम्ही मराठीत वारली मिसळून टाकली. मुलांच्या भाषा वापरात सहजता आली, आणि भाषाविस्तारही झाला. त्यामुळे वारलीमिश्रित मराठी ही मुलांची शिक्षणाची भाषा झाली. हे होऊ शकले याचे कारण म्हणजे वारली ही मराठीचीच एक बोली आहे, आणि मुलांना आजूबाजूच्या वातावरणांतून मराठीचाही परिचय होता.

मुले जेव्हा प्राथमिक शाळेत प्रवेश करतात तेव्हा एक वेगळाच भाषिक प्रश्न आ वासून पुढे येतो. हा असतो, शिक्षणात जो अनिवार्य असतो तो म्हणजे भाषेच्या शिक्षणाचा प्रश्न. वारली मुलांना वारली बोली व मराठी बोलीकडून शिक्षणातील प्रमाण (मराठी) भाषेकडे नेणे ही त्यातील पहिली पायरी. ही प्रामुख्याने प्रमाण भाषेच्या वाढत्या वापराने आणि सततच्या सरावाने ओलांडायची पायरी. त्यानंतरची पायरी म्हणजे प्रमाणभाषा नीटपणे, धीटपणे, स्पष्ट व नेमके उच्चार करून बोलता येण्याची पायरी. दुसऱ्याने बोललेली भाषा समजणे तेवढे कठीण नसते, पण भाषा आकलन होणे वेगळे आणि भाषेची अभिव्यक्ती करता येणे वेगळे. भाषेतील शब्दांचे उच्चार तर महत्त्वाचे असतातच पण, त्याहूनही, मनातले भाषेत बोलून सांगता येणे हे महत्त्वाचे असते. यासाठीची तयारी मानसपातळीवर व्हावी लागते. मुलांना, आपल्याला जे म्हणायचे आहे ते मनातल्या मनात संघटीत करता यायला हवे. मनातला आशय वाक्यरूपात संघटीत करावा लागतो, मग तो

तसाच उच्चारता येतो. पुन्हा बहुतेक वेळा, एक वाक्य सर्व आशय सांगत नसल्यामुळे त्यासाठी वाक्यमालिका मनामध्ये संघटीत करावी लागते. सुरुवाती-सुरुवातीला मुलांना या मानसपातळीवरील क्रियेसाठी खूप वेळ लागतो पुढे पुढे मात्र हे काम कमी वेळात आणि सहजतेने होत जाते. याच दिशेने तिसरी पायरी असते ती पुढील शिक्षणात आवश्यक अशी चांगल्या भाषेच्या तयारीची. मेंदूमधील स्मृतिकोशात साठलेला मोठा शब्दसंग्रह ही समृद्ध भाषेसाठीची प्रधान अट असते. शब्दसंग्रह हा संख्येनेतर मोठा असावाच लागतो, पण 'गुणा'ने ही तो मोठा असावा लागतो. गुणाने मोठा याचा अर्थ, शब्दसंग्रह विविध प्रकारच्या शब्दांचा संग्रह होय. शाळेमध्ये, पुढे अनेक शास्त्रीय विषय येत असतात, त्यांमधील संकल्पनात्मक संज्ञा हा शब्दसंग्रहात समाविष्ट व्हावा असा एक शब्दप्रकार असतो.

एखाद्या शब्दाला समानार्थी शब्द, विरोधी अर्थांचे शब्द, विशिष्ट अर्थाच्या अन्य छटा दर्शविणारे शब्द, अनेक अंगांनी वर्णन कर शकणारी विशेषणे वा क्रियाविशेषणे, विविध भौगोलिक, व्यावसायिक क्षेत्रसंबंधी शब्द असे कितीतरी शब्दप्रकार. आपल्या अंगावर, भाषा, दागिन्यांसारखे मिरवीत असते. त्यांची ओळख, त्यांचा अर्थपूर्ण व चपखल वापर आपली भाषाभिव्यक्ती समृद्ध करीत असतो. त्यामुळे शालेय शिक्षणाने मुलांना ही भाषासमृद्धी द्यावयाची असते.

ज्यांना घरांतूनच अशा समृद्ध भाषेचा वारसा प्राप्त होतो, किंवा ज्यांच्या भोवतालच्या वातावरणांत विविधांगी भाषा भरून राहिलेली असते अथवा, ज्यांना विविध, दमदार प्रत्यक्ष अनुभव भरपूर प्रमाणांत प्राप्त होतात अशांच्या बाबतीत शाळांना भाषासमृद्धीची फारशी जबाबदारी घ्यावी लागत नाही. परंतु ज्यांच्या बाबतींत, कोणत्याही सामाजिक, ऐतिहासिक कारणांमुळे, भाषेची समृद्धी नव्हे तर भाषेची गरिबीच पदरात पडलेली असते, अशांना शालेय शिक्षणात केवळ भाषाभ्यासच नव्हे तर सर्वच विषयांचा अभ्यास अडथळयांचा ठरतो.

**भाषेची गरिबी**

माणसाला पहिली भाषा ही लहानपणीच निसर्गतः अवगत होत असली तरी तिचा, व्यक्तिगत स्तरावरील विकास हा सर्वस्वी भाषानुभवांच्या मिळणाऱ्या संधींच्या स्वरूपावर, संख्येवर आणि विविधतेवर अवलंबून असतो. भाषानुभवांच्या मिळणाऱ्या संधी ही, व्यक्ती भोवतालच्या वातावरणांत घडून येणारी पूर्णतः समाजिक गोष्ट आहे.

माणसाला भाषा नीटपणे यावी लागते कारण त्याला ती आयुष्यभर वापरायची असते; वेगळया शब्दांत सांगायचे तर भाषा आपण कमवायची असते कारण आपल्याला तिचा सातत्याने उपभोग घ्यायचा असतो.

❖